


ई-प्रकाशन- मराठीवर्ल्ड.कॉम

सावळ्या रे

'सावळ्या रे,...' हा राधा, कृष्ण आणि मीरा यांच्या अंतरंगात शिरून त्यांच्या नातेसंबंधांचा धांडोळा घेण्याचा एक नम्र प्रयत्न आहे. नात्यामध्यून प्रेमाचा आविष्कार होत असेल तरच ते नातं रसरसतं, फुलतं आणि बहरास येतं. 'सावळ्या रे,...'मध्ये एका भावातूर रीतीनं काही पाहण्याची कसोशी आहे. राधा आणि कृष्ण हे समकालीन प्रेमीजीव असले तरी, त्यांनी अनुभवलेलं, अधोरेखित केलेलं नातं, हे त्यांच्या काळातून निघून आजही युगानुयुगं पुढं वावरत आहे, कुठल्या ना कुठल्या प्रकारे साकारत आहे. 'सावळ्या रे,...' ही आहे, फक्त एक हाक. एक आस्था. अंतर्प्रवासाची एक उर्मी... अगदी प्राकृतिक अशी. -'तिची' 'त्याला' असलेली एक आर्त हाक - 'सावळ्या रे,...'

## उत्कृष्ट कवितासंग्रहाचा राज्यस्तरीय पुरस्कार

(सुजाता पाब्रेकर स्मृती प्रतिष्ठान पुरस्कृत)


सावळ्या रे

| | |
|---|---|
| कवयित्री - | अनघा नितीन दिघे |
| ई- प्रकाशक- | मराठीवर्ल्ड.कॉम, १४-ए, ४४, वृंदावन सोसायटी, ठाणे पश्चिम, ठाणे- ४००६०१ |
| दूरध्वनी - | २५३३९७९९, २५३७८०८२ |
| ई-मेल - | mw-content@marathiworld.com, info@marathiworld.com, vinay@cnpl.co.in |
| मुद्रीत कवितासंग्रह प्रकाशन - | आविष्कार पब्लिकेशन्स, दूरध्वनी- ९२२३२०९६९९ |
| मुखपृष्ठ - | संतोष पाढी |
| ई-सजावट व मांडणी - | शलाका गद्रे |
| प्रोग्रॅमिंग साहाय्य - | मनिषा कापडणीस |
| शीर्षक अक्षर सुलेखन - | किरण चांदोरकर |
| रेखाचित्रे - | प्रमोद ब्रमाणिया |
| प्रथम आवृत्ती - | २४ जुलै २००२ |
| दुसरी आवृत्ती - | १७ ऑक्टोबर २००३ |
| ई-आवृत्ती- | ७ सप्टेंबर २००४ |


अर्पणपत्रिका

६ वर्षांचा असताना, "अशीच एक कॉपी 'इंग्लिश'मध्ये कर आणि ऑस्ट्रेलियाला पाठव"- असे सांगणाऱ्या माझ्या मुलास - श्वेतकेतुस...




ई आवृत्तीच्या निमित्ताने

कृष्णकिनारा लाभण्याची धडपड कळत नकळत प्रत्येक जीव करीत असतो. कृष्ण ही एक अनुभूती आहे. ते केवळ महाभारतातील एक पात्र नसून, तो जीवसृष्टीचा पालक, धर्ता, आणि रक्षक आहे. भरणपोषण करणारा, उत्कटतेस दाद देणारा, साद ऐकणारा प्राणनाथ असे वैश्विक चैतन्य म्हणजे, 'सावळ्या'!!

माझ्या पहिल्यावहिल्या काव्यकृतीला 'उत्कृष्ट कवितासंग्रहाचा राज्यस्तरीय पुरस्कार' मिळाला. परंतु, त्यापूर्वी विख्यात समीक्षक श्री. ग. प्र. प्रधान, सुनीताताई देशपांडे यांची पत्रे आली. तसेच जे. जे. कलामहाविद्यालयाचे प्राचार्य श्री. मंगेश गो. राजाध्यक्ष यांनी आवर्जून कौतुकाचे चार शब्द मला लिहून पाठविले. 'सावळ्याच्या साक्षीभावानं जगायचं', 'आज'मध्ये जगायचं म्हटलं तरी, राहून राहून या आठवणी मनामध्ये रेंगाळतात!...

काही ना काही नवनवीन 'सावळ्या रे,...'च्या बाबतीत घडतं ही त्या सावळ्याचीच मनिषा आहे, यात मला तिळमात्रही शंका राहिलेली नाही. आजच्या तरूणाईची रूची दिवसेंदिवस बदलत आहे. अत्याधुनिकतेची सवय झालेल्या युवा पिढीनेही 'सावळ्या रे,...' ला दाद दिली याचं विशेष समाधान वाटतं. आज गोपाळकाल्याच्या दिवशी 'सावळ्या रे,...' ची ई-आवृत्ती प्रकाशात येत आहे. जागोजागी गोविंदाचा नाच, हैदोस, धम्माल जितकी सुरु आहे, तितकाच संतोष आज माझ्या मनातही ओसंडतो आहे.

ई-आवृत्तीचे प्रकाशक श्री. विनय हिंगे यांना मनापासून धन्यवाद देते. मराठीवर्ल्ड.कॉमच्या संपादक सौ. भाग्यश्री केगे, सहसंस्थापक श्री. अनुराग केगे आणि वेळोवेळी प्रोत्साहन देणाऱ्या सौ. वैशाली हिंगे यांचेही आभार मानते. ई-आवृत्तीच्या डिझायनिंगची धुरा सांभाळताना, मला सर्वतोपरि सहकार्य देणारी माझी मैत्रीण आणि सहकारी कु. शलाका गद्रे हिचे देखील मनःपूर्वक आभार. मनिषा कापडणीस हिने प्रोग्रॅमिंग साहाय्य देऊन ई-आवृत्तीच्या तांत्रिक बाबी सांभाळल्या. मनिषालाही हार्दिक धन्यवाद. याबरोबरच माझ्या इतर सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

ज्याचं गाणं गायचंय, त्यानेच शब्द द्यावेत. आपण फक्त आनंद आणि आभारच मानू शकतो. ही अवस्था काही अंशानं तरी माझ्या वाट्याला आली. पुन्हा एकवार, मनातल्या आनंदाचा उल्लेख करावासा वाटतो...

घननीळ मेघ आरास । बरसतो श्रावण मास

एक हवाहवासा श्वास । गोकुळीचा चारूहास

दिन रातीचे भास । कातळ गतकाळी लुकलुकते

सौदामिनीचे तेज । अवघा व्यर्थ न ध्यास प्रयास

अनघा नितीन दिघे

श्रावण कृष्ण अष्टमी, गोपालकाला

संपर्क- ३ रा मजला, जे. सीतानिवास, पाटकर रस्ता, डोंबिवली, (पूर्व), जि. ठाणे- ४२१२०१

दूरध्वनी- ९२२३५१६३३८




ई-पुस्तके आणि मराठीवर्ल्डविषयी

२७ फेब्रुवारी २००० पासून मराठीवर्ल्ड.कॉमला सुरवात झाली. देशविदेशांमध्ये लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ अशी ही वेबसाईट आहे, याचा आम्हाला आनंद वाटतो. इंटरनेटच्या वाढत्या वापराबरोबरच, विखुरलेल्या मराठी वाचकांमधील एक दुवा बनण्याचं सद्भाग्य आम्हाला लाभलं.

'सावळ्या रे...' हा अनघा दिघे यांचा कवितासंग्रह २४ जुलै २००२ रोजी प्रकाशात आला. त्याची दुसरी आवृत्ती १७ ऑक्टोबर २००३ रोजी निघाली. २५ जानेवारी २००४ रोजी मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते या कवितासंग्रहास 'उत्कृष्ट कवितासंग्रहाचा राज्यस्तरीय पुरस्कार' लाभला. दर्जेदार कलाकृती जगभरातील मराठी वाचकांकरिता उपलब्ध करून देण्याचा मराठीवर्ल्ड.कॉमचा प्रयत्न आहे. त्यातीलच पहिले पुस्तक म्हणून आम्ही अनघा दिघे यांच्या 'सावळ्या रे,...' या कवितासंग्रहाची निवड केली, आणि खास श्रावण कृष्ण अष्टमी- गोपाळकाल्याचे औचित्य साधून आज दिनांक ७ सप्टेंबर २००४ रोजी त्याचे प्रकाशन करीत आहोत.

हा एक प्रयोग आहे, परंतु त्यामागे, वाचकांच्या वाङ्मयीन गरजांची दखल घ्यावी असा हेतू आहे.

त्याचबरोबर कवी वा लेखक ते वाचक हा थेट दुवा इंटरनेट वेबसाईटचे माध्यम वापरून निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. रसिक वाचकांनी हा कवितासंग्रह डाऊनलोड करून वाचावा, छापावा वा मित्रमंडळींकडे पुढे सरकवावा. तसेच त्याचे मूल्यमापन करावे. आपल्या प्रतिक्रिया आम्हाला कळवाव्यात, ज्यायोगे आपल्या अपेक्षांचाही आम्हाला अंदाज येईल. वाचकांना भावतील असे नवनवे प्रकल्प उत्तरोत्तर मराठीवर्ल्ड.कॉम हाती घेणार आहे, त्यात आपला हातभार लागावा ही अपेक्षा. कळावे...

श्री. विनय हिंगे

प्रकाशक

मराठीवर्ल्ड संपादन मंडळ

# सावळ्या रे

निळाईचं बोलावणं...

"प्रेम कसं असतं? पावसासारखं अनावर मुसळधार बरसणारं. गडगडाट करणारं. आस्थेचे ढग नुसतेच वाहून नेणारं... नभ व्यापणारं..." एका राधिकेला युगांतापूर्वी हे विचार सुचले. ती खूश होती. मनमुराद होतं सारंच तिचं 'असणं', तिच्या कान्ह्यासाठी... युगांताचा एक पाऊस एका राधिकेला झेपलाच नाही. तिनं तो अनुभवलाच नाही. पाऊस तसाच होता. निळं आकाश झाकोळून टाकणारा... ज्या झाडाखाली राधा उभी होती, त्यावर चमचमतं पाणी बरसत होतं. बहरत होतं. राधिकेला वाटलं, प्रेम अमर आहे. कान्हा अमर आहे. राधा गहिवरून गेली. कोंदटल्या धुक्यासारखा काठोकाठ उचंबळलेला तिचा ऊर... त्याच तंद्रीमध्ये राधा चालत राहिली. पावसाचे थेंब अंगावर पडत नाहीत, हे राधेला समजल्यावर ती दचकली. असं घडलंच कसं?... कान्ह्याचं प्रेम आपल्याला भिजवत का नाही? सुन्न झाली राधा ! ज्या झाडापासून चालत आली, त्या झाडाकडे राधेनं पुन्हा वळून पाहिलं. आश्चर्य असं की, त्या झाडाखाली पाऊस होता. सोसाटा होता. झाडाच्या सांदी-कोपऱ्यात, फांदी-मोगऱ्यात गहिऱ्या हिरव्या पर्णात साचले होते पाण्याचे थेंब. अमर प्रेमाचे अजरामर थेंब. ते तिथे जन्म घेत होते. जगत होते. मोठे होत होते. कोसळत होते. अचानक सोसाटा येई. सोसाट्यामुळे पानांमधून जोरदार पाऊस कोसळत होता. ते झाड... ते कदंबाचं झाड अन् त्याचा परीघ पावसात झळाळून उठत होता. हेलकावत होता; आणि आजूबाजूची सृष्टी वृष्टीविनाच... शांत स्तब्ध!

राधा थक्क झाली. कान्ह्याच्या प्रेमापलिकडे जग असू शकतंच कसं? कदंबाच्या परिघापलिकडे देखील पृथ्वी आहे?... राधेला वाटलं, आपला प्राण वर वर चाललाय. त्या प्रेमवृक्षाच्या छायेबाहेर जगता येणार नाही. तेंव्हा कदंबाच्या त्या सावलीत, पावसाच्या ओलाव्यात राधा परतत होती. तिच्या पायांना गती. उत्तरीयाचं फडफडणं- नुपूरांचा ताल- निघाली राधा...

इतक्यात एकतारीवरच्या एका विरहगीतानं राधेला थांबवलं. ते गीत गाणाऱ्या श्वेतवस्त्र धारण केलेल्या सात्त्विक स्त्रीकडे राधा निघाली. ती स्त्री त्या झाडाकडे पाहात होती. झाडाचं हेलकावणं पाहात होती. वाऱ्यानं हिंदोळून टपकणारे पावसाचे टपोरे थेंब पाहात ती उभी होती. राधा तिला म्हणाली, "कोण आहेस तू? काय करते आहेस? त्या झाडाकडे काय पाहाते आहेस? तुला कळतो, त्या झाडाचा अर्थ? लवकर बोल ना! माझा... श्वास थांबेल. मला एकटीला मरायचं नाहीये. मला परतायचंय त्या पावसात"

ती स्त्री म्हणाली, "कारणं शोधू नकोस सखी, कारणं सांगूही नकोस. मला कळतो त्या झाडाचा अर्थ. पावसातनं ठिबकणारा नि:स्वार्थ! तुझं हे क्षणोक्षण धाप लागणं... म्हणून म्हणते जा. सखी तू जा. इथं थांबू नकोस. इथे वणवा आहे. हा वणवा तुला सोसणार नाही. जा तुझ्या कदंबाकडे, त्या पावसाकडे, नाहीतर मी तुला सांगून टाकेन की, या झाडापलिकडे पृथ्वी असू शकते. असू शकतो उन्हाळा, या पावसाच्या चहूबाजूला. या थेंबांच्या मर्यादेपलिकडे विस्तीर्ण मृगजळ, वणवा असतो. तू ते मानणार नाहीस. वाद घालत बसशील. मी मात्र भिजेन, आणि तू मात्र मरशील... जा. तू जगायचं आहेस, ही नियती आहे. मी भिजायचं नाही, ही नियती आहे. जीर्ण, पुरातन व्हायचं नाही कदंबानं... ही नियती आहे. जा सखी जा. त्याच कदंबापासून बनविलेल्या या एकतारीची शपथ आहे तुला. जा तू, तुझ्या कदंबाकडे..."

अधीरपणे राधा तिच्या कदंबाकडे धावत सुटली. तिचं उत्तरीय तरळत राहीलं. निळं आकाश होऊन. एकतारी झंकारत राहिली. मीरा सारं पाहात राहिली. वणवा पिऊन मीरा एकदाच हसली, त्या दिवशी!



मीरेचं व्रत मुकं
कान्ह्याशी बोलतं
नि:शब्दाचं वेड तिचं
कान्ह्यालाच कळतं...

# सावळ्या रे

## मीरेची पूजा (१)

मीरेचा रस्ता
निघतो तिथूनच पुढे
धुळीत उमटते जिथे
नाजूक रेष
कृष्णाच्या रेंगाळणाऱ्या उत्तरीयामुळे
उत्सुक चेतना
त्या रेषातून वाहत जाते
तिथे मीरेची पूजा
जिथे उमटली
पावलं कान्ह्याची
मीरेचा श्वास तोपर्यंत
जोपर्यं वाहते आहे
अंतरंगी कृष्णाच्या
एक धमनी, मीरेच्या नावाची
तोपर्यंत मीरा आहे
तोपर्यंतच मीरा आहे...

## सावळ्या रे,... (२)

आज ह्या अंतिम क्षणी
होऊ दे एक आरंभ
सावळ्या रे,
तुझा थांग लावताना
अथांग वेदना हाती गवसते...
नसतं का काही जपण्यासारखं
या जगण्याच्या पसाऱ्यात?
तुझ्या पावलांचा
वेध घेता घेता
कुठवर आले... यमुनेच्या तीरी
एकतारी सांभाळणारी
तुझी मीरा...
आणते बकुळीची फुले
ती कधी कोमेजतील
कालांतरानं सुकतील...
हरकत नाही
पण आहे हा श्वास तोवर
एक एक फूल
एक एक कळी
वेचू दे वेचू दे
माझ्या मनाच्या अखंड धाग्यामध्ये
एक एक कळी
गुंफू दे गुंफू दे
-तुझ्या नावाची...



## अनोखी कहाणी... ३

हे काय?- ही फुलं
अशी का चमकत आहेत आज?
माझ्या नयनांसमोर
कुठला हा प्रकाश?
अरे, ही वैजयंतीची माळ तर नाही?
सावळ्या रे, हे मणी...
तुझ्या माझ्या दरम्यानची
अनोखी कहाणी

## वृंदावनी वा गोकुळी... ४

ओळख एकच जातकुळी
चिंतनी भजनी वनमाळी
जगते जीवन त्याचे
त्याच्या सांज-सकाळी...
जे त्याचे ते माझे
असो मथुरेच्या तळीजळी
वृंदावनी वा गोकुळी
लोभावली त्यापाठी मीरा
सावळ्याच्या जे जे जवळी-

## प्रीत आपुली... ५

सावळ्याच्या मनीचा
लकाकता मणी
गुपित मीरेच्या कानी
सांगे कृष्णाची राधाराणी
"सोडुनी रीतभात
रूजवते प्रीत
कान्हा स्वर्णसंगीत
जन्मोजन्मीचे...
दोन डोळ्याचे एकच स्वप्न
दिवसा राती सांगाती कृष्ण
एक एकुलती आशा
रूजवते उजवते प्रीत आपुली
झुले घागरी चंदनवेल
जिवाशिवाचा रिंगणमेळ
तुझे लागले अद्‌भूत वेड
तोडुनी जन्म-मरण साखळी
अंताच्या पलिकडे
आरंभाच्या आधी...
रूजवते उजवते प्रीत आपुली...

## तूच तू... ६

अवनी अवघी व्यापणारा
तूच तू तूच तू
प्राक्तनांच्या रेषातरेषांत
तूच तू तूच तू
पाहिल्यावर मला,
गोड हसणारा
पाहिल्यावर मला
मलाच पाहणारा
तेजाळ हसरा मुखडा
रूंदावणारे बाहू
तेवणारे डोळे
कशी गं जपून ठेवू?
याला कुठे गं जपून ठेवू?...
हा तर मावतच नाही
इवल्या ह्रदयी राधेच्या
सामावतच नाही..."

## स्वप्नसावळी... ७

एका गाफील संध्याकाळी
गुणगुणली राधा
काळ्या किमयेचं गुपित
दिशांच्या कानात
हसल्या दिशा
गालातल्या गालात
मंत्रभारले सावळ्याचे बोल
त्याच्या कृष्णलीला
लाजलाजून राधेनं
सांगितल्या उषेला...
खळाळून हसली उषा
तिच्या गालाची लाली
लाल रंगल्या प्रेमदिशा
प्रीतीच्या सकाळी
हलकी टिचकी दवमोत्यांची
राधेच्या गाली
स्वप्नसावळ्या राधेची
नजर झुकते खाली...
संकेत उषेचे अगम्य काही
उमगले परी ते चंद्रालाही
त्यानं तर केली नजर
राधिकेच्या प्रेमा अमर
स्वयंप्रकाशी एक चांदणी
स्वार्थाच्या अंधाऱ्या रात्री...
सावळ्याला सांगायचंय
हे सारं
वाटून घ्यायचंय सावळ्यासंगे
राधिकेला, हे सारं...
सावळ्या रे, कुठे आहेस तू?

## सावळा किनारा... ८

खिन्न शुक्रतारा
खिन्न एकतारा
गवसण्याच्या क्षणी
निसटता पारा
विरहिणी राधा
विरागी मीरा
छनक् छनक् झांजरी
शोधते किनारा
सावळा किनारा...

## रसाची धारा... ९

सावळ्या रे,
तू सत्य की आभस?
इथेच मीरेच्या
तनामनाच्या आसपास
... येत्येय का ऐकू?
घालते जी साद?
की, तुझाच हा प्रतिसाद?
हे कोण बोलावतंय
सावळ्या तुला?
माझ्यातून निघणारी
प्रत्येक राधा, प्रत्येक मीरा
पल्लव, पंचम, रसाची धारा...

## तेव्हापासून... (१०)

प्रेमकळी ते तेजकळी
केव्हा गं हा प्रवास घडला?
हिरवा कोंभ लसलसता
कधी गं राणी रूजला?
राजमातेनं मोठ्या ममतेनं
दिली मला तुझी सावळीमूर्ती
तेव्हापासून...
सुदूरशी सखोलशी ठायी ठायी
धरतीची गिरती गहराई
उन्हाचे पसरते झाड
धरतीमध्ये उतरत जाई...
एकाकीपणाचे घाव
काळजात असह्य झाले
अनिवार अश्रू नेत्री ओघळले
तेव्हापासून...
दशदिशांची एकाकी धून
संगीत अनाहत फिरून फिरून
शोधत्येय का तेव्हापासून?
जन्म-मरण-पीडा-व्याधी
जगाची मांडली भातुकली
भेटला शाम शाम शाम
मीरा लडिवाळ धटुकली
नियतीची तापती उन्हे
आपल्या माथ्यावर घेऊन
शीतल छायेची सावली दिलीस
दिलास दिलासा जवळ घेऊन
तेव्हापासून...
ऐसा झाला कहर कहर
हाती येई चंदन-पदर
तुझ्या उत्तरीयाची जर
फुंकर हळवी मनावर...
उमगली कान्ह्याची अनुमती
पालटे मीरेची स्थिती-गती
अप्राप्य-अलोट येता हाती
हुंकार अस्फुट, धूसर परिसर
विश्वासते पुसते डोळे
मीरेचे अंतरंग हाले-बोले
सावळ्याच्या अंतरी गहिवर
उत्तरीयाचा ओला पदर...
मऊ मुलायम रेशमी पोत
सळाळतो प्रेम धाग्यांमधून
मीरेसाठी सावळ्यामधून...
तेव्हापासून...

## उघडशी पापणी... (११)

"मिटता तू डोळे
रात्र माझ होते
उघडशी पापणी
तोच आणि दिनमणी
चमकती चंदेरी
बिल्लोरी जलमणी
तूच भेटशी सखया
नभी निळ्या क्षणोक्षणी"...

## नव्या जगात... (१२)

नव्या जगात पडे पाऊल
नवे प्रदेश नव्या वाटा
तुझ्या राज्याच्या परिसीमा
माझ्यात विस्तारणारी चाहूल
झुगारते आहे मर्यादा
माणूस, देश, जन्म यांच्या
तुझ्या खांद्यावर माथा टेकून
विसावले तेंव्हापासून...
लाभली लय गवसला ठेका
श्वासांचा लागला मंद्र सूर
तुझ्या मनाच्या समेवर
माझ्या गीताची आलापी
तेव्हापासून...

## वेडी धुंदी... (१३)

स्पंदने तुझी, मुरली स्वच्छंदी
प्राणांत वाजती हृदयात गाजती
कान्हाई-मीरा नाते बहुरंगी
अस्ताई-अंतरा सावळी गं धुंदी
एक वेडी धुंदी
एक वेडी नशा
वेढुनी दशदिशा
उमलते माझ्यातून
असोशी- अशी आवर्जून
राजमातेनं मोठ्या ममतेनं
दिली मला तुझी सावळीमूर्ती
तेव्हापासून...

## गालावरची खळी... (१४)

सोनसळी सूर्यकिरणे
तुझ्या हास्यातले मार्दव
जिकडे तिकडे चोहीकडे
निळे-सावळे वास्तव
गवतामधली रानफुलं
तशी गालावरची खळी
तेज तुझ्या डोळ्याचं
जशी दिवेलागणी
सुंदर ही रानफुलं
सानुली ही खळी
हसवती दोन्ही मला
खुलते मनाची कळी...

## हे प्रेमतराणे... (१५)

जाणवतोय जो...
तुझा श्वास
की शरदातील
चंद्रप्रकाश?...
अंतर्मनाच्या तळ्याकाठी
निरंतर गीत गातो आहेस...
तू इथे आहेस माझ्यापाशी
की तिथे आहेस तुझ्याजागी?
तू आहेस तरी कुठे?
हे प्रेमतराणे, हे वेड दिवाणे
जोजवते मीरेला शामरंगी गाणे...

## भातुकली सोडुनी... १६

धाकुटी मीरा
कधी मोठी होते
भातुकली सोडुनी
राजमहाली जाते
पाहाते राजवाडे, झोपड्या नि रस्ते
भूक, यातना, दुःख, झगडे नि कज्जे
वेदना आतली, बाहेरही वेदना
हा गरीब, हा अडला, हा दीनवाणा
मरण्याआधीचा जगण्याचा घाणा
अधुराच दिवस, अधुरेच कामकाज
आवर्ती त्याच, भिनू दे गं कान्हा...

## उन्मनित नाचरी... १७

पोकळीत पावरी
उन्मनित नाचरी
क्षितिजाची दिव्य रेष
सावळ्याचे घरही तेच
मीरेची तीच वेस
झनक् झनक् झांजरी
उन्मनित नाचरी
रिंगणात भिंगरी
मधुमीरा बावरी
पोकळीत पावरी...

## मीरा बावरी... १८

वेडाच्या झुल्यात झुलताना
सावल्या विखुरताना
उन्हामनाचे कवडसे
आकार उकार देताना...
किण् किण् किण् किणकिणते
प्रणव प्रेमाची झांजरी
छन् छन् छन् छनकते
मधुरसशी घागरी
झन् झन् झन् झनकते
तुझ्या नावात मंजिरी
मन् अमन् तनु सजे
मिठीत मीरा बावरी...

## थिरक लय... १९

मनवीणेचा पंचम
कृष्ण आमदाची ठाय
सामावल्या वादळानं
गमावलं ते काय?
सत् चित् प्रेमात
मीरेचे थिरकणारे पाय
सैर-भैरवीचा अनावर
रानोमाळ जाय...

## तुझी सावली... (२०)

लखलखती बकुळीची फुले
मीरेची थिरकणारी पावले
असण्या हसण्या हिंदोळे
एक मीरा झुले एक राधा झुले
प्रीत सावळी रंगरंगी खुले
एक मीरा डोले एक राधा बोले
"मी कोण?... तुझी सावली..."

## कृष्णआभाळी... (२१)

गहिऱ्या निळ्या संध्याकाळी
उडत राहातं कृष्णआभाळी
राधेचं मन हिरव्या राव्यावाणी
गहिऱ्या निळ्या संध्याकाळी...
झळाळणारं वस्त्रं किनखापी चोळी
चमकते पैंजण, चांदण्यांच्या ओळी
वाऱ्यावर झुलणारे उनाड केस
राधा निघाली ओलांडून वेस
डुलत्या पानांची चंद्राला टाळी
गहिऱ्या निळ्या संध्याकाळी...
वेळूच्या बनात मृदंग मृदंग
कान्ह्याच्या चिंतनी राधा झाली दंग
निळे, जांभळे, ओढणीचे रंग
राधेचे खुलणारे अंग अंग
पंचप्राण उसवती सावळ्या ओळी
गहिऱ्या निळ्या संध्याकाळी...
केवड्याची पाने, करवंदी जांभळे
ओटीत भरून प्राजक्ती फुले
अनाम राग-लय-ताल डोले
सलत्या काट्यांची कापुसली जाळी
गहिऱ्या निळ्या संध्याकाळी...

राधेजवळी राधा ना उरली
दोन मने कशी तंद्रावली
चाल चालते एक सावली
चांदणे सांडते पावलो-पावली
गहिऱ्या निळ्या संध्याकाळी...
ही कशी गं रूतली खोट
हा कसा गं खोडा अडला
करवंदाच्या जंजाळीत
सावलीचा 'मी' अडकला...
ह्या 'मी'चा खोटा देखावा
खोटेच ह्याचे प्रदर्शन
सावलीचे परमात्म संधान
मनोमय उन्मन चिंतन
अडखळते पाऊल वाटेत
अडकतो पदर काट्यांत
निसटतो कन्हैय्या निमिषांत
चल, चल वेळूच्या बनात...
चल, चल वेळूच्या बनात
पावरी घुमते कानांत
तनामनांत डोलतो कदंब
एकतारी झंकारते संगीत
चल्, चल वेळूच्या बनात.

## भेट पहिली... (२२)

कान्ह्याच्या रस्त्यावरून
भेट पहिली वाहिली
तिथेच सांडूनी 'मी' ला
पुढे निघाली सावली
ओसंडतो निळ्या रत्नामधून
दूर दूर वर नितळ प्रकाश
अवघ्या पृथ्वीला नवीनच जाग
पार अवकाश धवल प्रकाश
अमोघ प्रेमाच्या ओघवत्या सकाळी
- गहिऱ्या निळ्या संध्याकाळी...

## तुझं माझं नातं... (२३)

वेळूच्या बनातला प्रेमवारा
पिऊन बकुळ बोलू लागला
स्पर्धा करिते याच्याशी
सावळ्याची वैजयंतीमाळा
आज हा बकुळ बोलू लागला
कळू लागलं घननिळ्या
तुझं माझं नातं त्याला...



## फुलपाखरासारखं... (२४)

तुझं माझं नातं...
अम्लान विमल
मानवी संदर्भापासून
दूरदूरवर गेलेलं
संतत्त्वाकडे झुकलेलं
विरागी रंगात
बरचसं रंगलेलं
चक्राकार-हलकं
फुलपाखरासारखं
मैत्रीच्या मधावर
फिरून पोसलेलं
तुझं माझं नातं...
आत्मतेजामधून
न्हाऊन निघाणारं
प्राणपरिक्षेमधून
झळाळून उठणारं
सप्तलोकांमधून
फिरून येणारं
सप्तस्वर्गांना
बदलून घेणारं
तुझं माझं नातं...
अदृश्य तरी सन्मय
निराकार तरी चित्रमय
रंगलेलं आणि चैतन्यमय
तुझं माझं नातं...
सजगपणे अथकपणे
जगणारं जगवणारं
पुन्हा पुन्हा उगवणारं
ग्रहगोलांच्या फेऱ्यातून
अलगद ओढणारं
ताऱ्याकडे नेणारं
ताऱ्याचं तेज पिणारं
प्यायलाही लावणारं
तुझं माझं नातं...
येते तुझी आठवण
या बकुळीच्या फुलांना
येते तुझी आठवण
जीवाच्या जीवांना...
.

## कौतुके ऐकतो... (२५)

सोडुनी अबोल बहाणा
बकुळ गाई प्रेमतराणा
कौतुके ऐकते मीरा
कौतुके ऐकतो कान्हा
एक तुझी आठवण
सदा सदैव ताजी
निस्तेजल्या फुलावरी
शिंपडावं पाणी...
तशी मनोमनी तुझी
रुणझुणती रे गाणी
- अशी तुझी आठवण...

## अशी तुझी आठवण... (२६)

नेत नाही आगे-मागे
गुंफते असण्याचे धागे
सुरेल स्वरांचा स्वीकार
घुमतो अंतरात मल्हार
परीस जसा लोहाच्या मनी
आठव तुझा सोन्याचा धनी
उजवाडती दिशा दाही
आठव होई प्रकाशमणी...

## कान्ह्याच्या गावा... (२७)

मनमोकळी-स्वरपाकळी
उमलत्या गिरकीच्या ओळी
गिरकीतून उमटे मंत्रावली
आठव मनाच्या तरंगतळी
मनमोकळी-स्वरपाकळी
नाचण-भिंगरी नाचे गं
तुझेच तन-मन जागे गं
कान्ह्याची टिपरी गाजे गं
गुंजते हाळी धून वाजे गं
चल चल कान्ह्याच्या गावा गं
राही तिथेच तिन्ही त्रिकाळी
मनमोकळी-स्वरपाकळी
उमलत्या गिरकीच्या ओळी...

## बोलाव जीवा... (२८)

झुलव मला झुल्यापरी
आठव मला काट्यापरी
साठव मला फुलापरी
बोलाव जीवा, बोलाव जवळी
मनमोकळी-स्वरपाकळी
उमलत्या गिरकीच्या ओळी
उमलणार कशी स्वरपाकळी
निसटते माळेतून ही बकुळी
थरथरती मीरेची बोटे
कधी बकुळ बाभळी होते...

## जडली माया... (२९)

बकुळ बनला बाभळीचा काटा
कान्हा गवसण्याच्या नाही चोरवाटा
बकुळ बनला काळजातला सल
सावळ्यानं मांडलाय मीरेचा छळ
"जडली माया, पाया पडू गेले गं
झिजली काया दया नाही आली गं
हारली प्रिया, दूर दूरी शाम गं
व्याकुळ हृदया मिळू दे विश्राम गं..."

## बिनसण्याचे काटे... (३०)

काटे रूतले काटे रूतले
असण्यामध्ये, हसण्यामध्ये
नसण्याचे काटे रूतले
बिनसण्याचे काटे रूतले
अगणित अगम्य काटे
तृष्णेचे उफराटे
प्रेम ओंजळीतूनही
अश्रु नयनांच्या वाटे
झिरपती अभ्यागत काटे

## बकुळ कोमेजतो... (३१)

घमघमणारा बकुळ
कृष्णगावी जातो
घमघमणारा बकुळ
कृष्णकिनारी गातो...
जिथे रूसली राधा
तिथे बकुळ कोमेजतो
घमघमणरा बकुळ
घुमा होऊन राहतो

## रूसली राधा... (३२)

"आताशा गोकुळात वसत नाहीस
माझ्यासामोर बसत नाहीस
कुठल्याही दृष्टीनं दिसत नाहीस
तू काही-काहीच करत नाहीस
माझी वाट पाहात नाहीस
वेळूच्या बनात येत नाहीस
बहरत्या चद्राच्या उजळत्या रात्री
उरीपोटी भेटत नाहीस..."

## मी नकोशी? (३३)

"वल्लरी पल्लरी
गोपांशी लगोरी
तुझा रंगू दे खेळ
होय ना,
तुला कुठे आहे वेळ?
रंगशी दंगशी
जलक्रीडा करिसी
लहरींशी संमेळ
होय ना,
मी नकोशी, हवासा खेळ
- अवघे जगणे मात्र खेळ

## तुझा दुरावा... (३४)

तुझा दुरावा क्षणोक्षण
साहू तरी किती
त्रयस्थासारखं स्वत:कडे
पाहू तरी किती?
आहे काय, हवे काय
याची सुरू राहते गणती
भेद छेदूनी अशाश्वताचे
तुला बाहू तरी किती?
डोळियांत माझ्या
स्वप्नं तुझं मिटतं
जागेपणी कान्हा
मन तुझ्यातच जगतं...

## काही सांगायचंय... (३५)

भेटे जन्मांची पुण्याई
सुटे मरणांची लय
तुझ्या ठायी हिशेब सारे
तुझ्या किनारी तरंग वलय
सारं समजून उमजून
परक्यानंच वागायचंय
होय तुझ्याशी भांडायचंय
खरं तर, काही सांगायचंय...
दर्शनी चिंतनी तुझ्या
मन फुलतं अन् खुलतं
सारं सांगूनही...
थोडंस सांगायचं उरतं...

## देऊनही तुला... (३६)

जागं राहातं झुरलं मन
युगानुयुगं हरलं मन
लुटूनही अलोट मन
देऊनही तुला उरलं मन
रूणझुणलेलं दुखरं मन
पुन्हा पुन्हा वाटायचंय
फक्त तुलाच द्यायचंय
मनापल्याडचं काही गाठायचंय रे,
सावळ्या तुला भेटायचंय...
नको दर्पण नको संचय
काहीकाहीच नाही पाहायचंय
मनामधून मनापासून
किती दूरदूर जायचंय?...
तुझ्याचमुळे विसंवाद
एकेरीवर यायचंय
सुनं सुनं जगायचंय
की,...
काळकुपीत विरायचंय?...

## राधेचे प्रार्थन... ३७

...विचारांचे आवर्तन
आकारत जाई
राधेचे प्रार्थन
यमुना पुढे नेई...
नदीकिनारी उभी बावरी
करते प्रेमाचं श्वसन
प्रेम पिते, जगते प्रेम
स्मरते, करते, प्रेम सहन...
...विरहाचे घण घण
कडेलोटाचे क्षण क्षण
पिऊन हसायचं एकटीनंच
मृगजळाचे कण कण...
ही चित्तरंगी रात्र
विरघळती गात्र-गात्र
जरी अशक्य स्पर्श तुझा
परी ध्यान मात्र अहोरात्र
आले अचानक वाऱ्यासवे
मोहमयी श्वास कान्ह्याचे
अलगद अधांतरी होई
मीलन प्रेमी-जीवांचे...
उंचापुरा छेलछबेला
भावजीवाचा रंगरंगीला
आला सूक्ष्मकणासम आला
प्राणांचा वाहे कैफ-काफीला...

## आलोक नवा... ३८

अंतरंगातून राधेच्या
निळाई निळाई...
हलका निळा प्रकाश
रात्रीमध्ये उतरत जाई
राधा बोले, जीवाच्या जीवा
एकरूपसे... विलगलो वा
नाकारू नकोस प्रेम-चांदवा
उजळू दे मनोमनी आलोक नवा...
राधेचे जीवन कान्ह्याच्या पायी
सातीलोक साती स्वर्ग आणि पाताळही
कर मैत्र, कर तह अथवा लढाई
अमर असू दे मनीची निळाई निळाई
उधाणल्या लाटा हिंदोळ भवसागरा
डळमळते डचमळते भावनांचे तारू
उगवतो, स्थिरावतो साक्षीचा तारा
लोभावतो, लाभतो राधेसी प्रेमकिनारा
राधेचे बोल पोटात जपून
पसरत राहतो प्रेमकिनारा
रात्रीमधून... दिवसाकडे
यमुनेपासून, कुरूक्षेत्राकडे...

## मिटल्या डोळ्यांना... ३९

ज्यावेळी ज्यासमयी
दूर दूर कान्हा जाई
होई कसा विरह, विसर
होई कशी राधा उतराई?
सुने सुने झाले
आतुरले गोकुळ
हंबरती व्याकुळ
अवघ्या दिशा दाही
मिटल्या डोळ्यांना राधेच्या
दिसतो कृष्णाचा प्रवास
मिटल्या ओठांना राधेच्या
कृष्ण-मौनाचा सुवास...

## डोळ्यापल्याडचे हसू... ४१

त्यासमयीची तुझी नजर
त्यासमयीचे तुझे हसू
सुखवित-खुलवित राधेला
मीरेचे लोपविते आसू
जन्मांच्या उत्सवास
उजळले दीप जसे
मरणांच्या प्रवासात
पारिजात प्रसन्नसे
आपल्यातले असून
ना बांधलेले हसू
डोळ्यांतले असून
डोळ्यापल्याडचे हसू
- त्यासमयीची तुझी नजर
त्यासमयीचे तुझे हसू...
पृथ्वी, आप, तेज, वारा, आकाश
सर्वांच्या पार तुझा अवकाश
कुठूनही कसाही कृष्णा
हलकेच बघ ना, हलकेच हास...

## सखी सहवास... ४०

तापल्या प्रवासी कृष्णा
लाभे राधेची सावली
नेण्या कृष्णरथ पुढे
आपणच वाट झाली
दिसते राधा अविचल जरी
प्राण तिचे परी करीत प्रवास
हसतो कान्हा अविरत जरी
मुकतो, स्मरतो सखी-सहवास
कुणा शोधते तुझी नजर?
का प्रेम-तराणा ओठावर?
तळ्यात पाहे कृष्ण परी
छबीत उमटे प्राणसखी
बघती तारे, वाहती वारे
त्यासमयीची तुझी नजर...

## सावळ्याची मीरा... ४२

कृष्ण-राधेचं भांडण
कृष्ण-राधेचं मीलन
कृष्ण होते, राधा होते,
जगते मीरा दुहेरी जीवन
नव्या जन्मामधे
नाते जुने विणते
कृष्णाची राधा
सावळ्याची मीरा होते...

## भेटण्याची आस... (४३)

इच्छा आकांक्षा अपेक्षा
सारं बाजूला ठेवायचंय
मीरेच्या सामोरा आल्यावर
नजरानजर झाल्यावर
निर्व्याजपणं हसायचंय...
सावळ्याला भेटायचंय...
इतकी कशी गं आर्त,
भेटण्याची आस?
जन्मानुजन्मीचा कृष्णहव्यास?
कृष्णमेघाचीच हवी बरसात
इतकी कशी गं आर्त,
भेटण्याची आस?...

## मीरा कान्ह्यापाशी... (४५)

संदेश पाठवता पाठवता
आपणच संदेश होते
एकतान-एकतार-झंकार
मीरा कान्ह्यापाशी जाते
अलोट, अनिवार, पारदर्शी
झुळझुळ मंजूळ लाट जशी
सावळ्या रे, आले तुझ्या पायाशी
मनसरिता पावन तव पदस्पर्शी...
प्रेम-भावनांची बरसात जशी
प्रेम-लाटेमध्ये जरी खरा भिजशी
ना भिजण्याचा बहाणा करिशी
परी आले आहे रे, तुझ्याचपाशी
खुलू दे साऱ्या सृष्टीमधुनी
तुझे हसू लखलख मोत्यावाणी
फुला-फुलांना मिळू दे संजीवनी
सावळ्या एक हीच रे विनवणी

## शामसंग हवा... (४४)

"पाठवा कोणी संदेश वा
एकच धाडा सांगावा
किती जन्म किती मरणे
जाऊ दे काळ कितीही अथवा
सत्यापरी... स्वप्नांतरी
शाम हवा, शाम संग हवा
नाना अनुभूतींच्या पदरी
निळासावळा रंग हवा..."
"कळीपाकळीची स्वच्छंद हवा
मृद्गंध हवा, मधुछंद हवा,
अनुगीत हवे, अनुराग हवा,
अनुप्रीतीचा अनुताप हवा...
सुरक्तातील विरक्त हवा
स्पर्शामधला हर्ष हवा
नि:शब्दातही ध्वनीतही
सावळ्याचाच प्रकर्ष हवा
शाम हवा, शामसंग हवा..."

---

लालचुटुकशा ओठांमधुनी
नाजुक तिरक्या रेषांमधुनी
राधेच्या मनी मीरेच्या ध्यानी
हसू सदैव ते राहते खुलुनी...

## हे गालात हसणं... (४६)

हे सुंदर हसणं
हे मोकळं हसणं
कान्ह्या तुला जपायचंय...
हे मनात हसणं
हे जनात हसणं
अमर्याद वाटायचंय...
हे गालात हसणं
हे हालात हसणं
पैलतीरी न्यायचंय...
हे मंगल हसणं
हे अद्‌भूत हसणं
कान्ह्या सर्वांना द्यायचंय...

## स्नेहल प्रेम... (४८)

हसवणारं स्नेहल प्रेम
जोजवणारं पुष्कळ प्रेम
कान्ह्याचं-मीरेचं प्रेम...
दुखवणारं दुर्मिळ प्रेम
रूतवणारं अटळ प्रेम
कान्ह्याचं-मीरेचं प्रेम...
वाढणारं वर्तुळ प्रेम
अनिवारसं अतुल प्रेम
कान्ह्याचं-मीरेचं प्रेम...
निखळली माळ बकुळीची
गोळा करते मीरा
अंधुकशा कातरवेळी
चाल चालते मीरा...

## प्रेमाचा स्वीकार... (४७)

चिरतंद्रा ही मीरा
अनुभवते चमत्कार
क्षणोक्षणी मनोमनी
कृष्ण होय साकार
मीरेचे स्वप्न घेई आकार...
हा प्रेमाचा संस्कार!
गोकुळात घडणारा
वृंदावनात उमटणारा...
हा प्रेम आविष्कार!
कालियाचं दमन
विषाचं वमन करणारा...
हा प्रेमाचा स्वीकार!
द्वारिकेच्या मंदिरी
मीरेच्या घरी वास करणारा...

## मीरा विरहामधे... (४९)

जीवाच्या आकांत क्षणी
खूणगाठ एकच हाती
मार्गदर्शी एकच तारा
चाल चालते मीरा...
सलग सुटा निसटता बकुळ
कान्ह्यापायी मन व्याकुळ...
जाता एकाकी दूर सुदूर
मीरा विरहामधे चूर चूर...

## रास रंगे... ५०

सर सर ओझरती पाचू-हिरे
पैंजण चुनरी चमचम घागरे
साज-शिणगाराल रंग चढे
आज प्रेम-चांदव्याचा ऊर भरे
थक्क झाली हद्द झाली
बद्ध मीरेची पावले...
शर्थ झाली व्यर्थ झाली
सुन्न मीरेची पावले...
सावळ्याचा रास रंगे
थंड मीरेची पावले...
गोपिकांचे गीत संगे...
खिन्न मीरेची पावले...

## परका तू... ५२

गंमत गट्टी खेळ वाढे
जाशी पुढे लाडे-कोडे
वारेमाप त्यांची माया जडे
जनप्रीतीचे तुज पडे साकडे...
ह्या गोपिकांची एक आगळीक
लटकीच त्यांची वग-लगबग
खातर-जमा मैत्रीची अधिक
तुझाही ओसंडतो अनुराग
का येऊ नये रे राग?
धड् धड् धमनीमधे... आग?
नस् नस् थडथडते... आज
धस् धस् उरकते... ह्रदयास
ठस् ठस् परका तू चारुहास...
का येऊ नये रे राग?
कोणी वाहती तुज माळा
कोणी म्हणती, "कान्हा बाळा"
तुझ्या बटांशी चोरटा चाळा
जा खुशाल त्याला कवटाळा...

## त्यांची माया... ५१

ह्या गोपिका-
कशा आगळ्याच वेगळ्या
ह्या गोपिका-
तुझ्या चिंतनात दंगल्या
ह्या गोपिका-
लयलूटती निज ह्रदया
ह्या गोपिका-
जणू खुलल्या प्रेमकळ्या...

## यमुनेच्या काठी... ५३

यमुनेच्या काठी रंगतो रास
गोपींच्या टिपऱ्यांची आरास
लोटती गेंद फुलांचे झेले
टिपरीला-टिपरी ताल झकास
यमुनेच्या काठी रंगतो रास...
दीर्घ चुंबन कुणी घेते
कुणी गाती कान्ह्याची गीते
मीरेच्या भ्रमाचा होतो निरास
यमुनेच्या काठी रंगतो रास...
कान्हा आणतो मृदंग-टाळ
कान्हा बांधतो कुणाचे चाळ
कान्हा माळतो कुणा वेणी
कान्हाही दंग नर्तनी आज
यमुनेच्या काठी रंगतो रास...
फाटते धरणी सांग करू काय?
लोटतो दूरी ... सावळा गं- माय...
अवघ्याचा समजू अर्थ काय?
मीरा विराणी नि:श्वसिते 'हाय!'...

## आठव ती प्रीत... (५४)

बकुळापाशी येऊन
बोले वैजयंतीमाळा
पूर्वी आली जेव्हा कधी
अशीच नाजुक वेळा
त्यावेळी राधाराणीचा
समजूत काढी शाम
थांब बकुळा थांब
मीरेशी जरा सांग
- आठव ती प्रीत...
संदेश प्रेमाचा
सावळ्याच्या बासुरीचा
सूर पाझरे 'अद्‌भूतसा'...

## किती छान तू!... (५५)

"मी रास खेळतो
म्हणून ती रागावते
तिच्याविना मी अधुरा
हे तिला कसे ना कळते?"
"प्रिये किती छान तू!
माझे प्राण तुजपाशी
श्वासांची सांडतो गीते
सखये मजला अहोरात्र
तुझीच आठवण येते...
चंद्राचं सत्त्वं पिऊन
सजेत प्रसन्नवदना
माझ्यापाशी येतेस
येतेस काय काय घेऊन...
जन्मांच्या आठवणी
मनडोहातील गहिरं पाणी
चाफा, करवंदे, शंखमणी
वेडं-बागडं काही आणि...
इष्ट-अनिष्टाची माझ्या
तुझ्यापाशीच धाव
कान्हा जाणतो एकच
राधाराणीचं नाव...
राधा आहे जीवनधारा
राधा आहे नदी
राधा आहे अप्राप्य तारा
राधा आहे मुक्ती
राधा आहे डोळ्यांपल्याड
राधा आहे जीवातल्या जीवात
राधा आहे जन्माअल्याड
राधा आहे मनातल्या मनात...

## प्रीत तुझी माझी... (५६)

प्रिये, किती छान तू!...
तुझं सारं विसरणं
माझ्यापाशी थांबणं
मलाच बघत राहणं
माझ्या निरर्थाला अर्थ देणं...
मला प्राणांशी धरून ठेवणं
सारं मलाच वाहणं
रमणं माझ्या तनामनात
तुझं हे असेच असणं...
प्रिये, किती छान तू!...
प्रेमगीत गाती गंधर्व स्वरांचे
प्रीत तुझी माझी संदर्भ युगांचे
आदी नाही अतं
मध्य नाही ज्याला
अवलोकितो आपले वेढलेले नाते...

## तुझ्याविना... (५७)

तुजवीण राधा शून्य स्वर्ग वाटे
ओझे घेरते मज पर्वत-गर्वांचे
कसे आवरू आवर्त युद्धांचे
कसे संपवू महाभारत पर्वांचे
तुझ्याविना हसणे पीडा ती अमाप
तुझ्याविना जगणे मात्र एक शाप
तुझ्याविना फिरणे नाना देश, प्रांत
भावभरी गहिरी वाढशी तू प्राणांत...
जीवाची भूल, लळा लागला
निवांत कूस दे गं मजला
राधे, रासेश्वरी, कान्हा गं तुझा
एकच भाव मनी साठला...

## प्राणसखी, कुठे आहेस?... (५८)

राधे, प्राणसखी, कुठे आहेस तू?
"मी इथे आहे कान्हा
तुझ्या मनामध्ये
मी इथे आहे कान्हा
मीरेच्या तनामध्ये
मी तिथे तिथे कान्हा
प्राक्तनांत प्रेम जिथे..."

## आपलं चित्र... (५९)

मिटवू शकशील कधी,
अणू-रेणूतले नाद?
थांबवू शकशील कधी,
तुझ्या नावाचे पडसाद?
पुसू शकशील कधी,
डोळ्यापुढचं आपलं चित्र?
बंद करू शकशील कधी,
नियतीचा उलगडला ग्रंथ?
शोधू शकशील 'स्व'ला कधी,
माझ्या शिवायच्या पसाऱ्यात?
रंगवू शकशील कधी,
माझ्या रंगाविना जीवनरास?
पाहू शकशील कधी,
हसरं जग स्वागतमय?
राहू शकशील कधी,
माझ्याशिवाय 'तू'-मय?...

## युगान् युगीची प्रेमिका... (६०)

संदेश ऐकते मीरा
राधेचा, अमर प्रेमाचा
सावळ्याच्या बासुरीचा
सूर पाझरे अद्‌भूतसा...
कान्ह्याच्या गावा गेली
आपणच कान्हा झाली
कान्ह्याचे श्वास घेऊन
मीरा माघारी आली...
मीरा झाली गोपिका
मीरा नदीचा काठ
कदंबाचा वृक्ष झाली
झाली बासरीचा घाट...
मीरा झाली राधिका
युगान् युगीची प्रेमिका...

## कधीतरी केव्हातरी... (६१)

वाट पाहते मीरा
एकाकी तारका
कधीतरी केव्हातरी
येईल शामसखा
सावळ्या हृदयी उमटणारी
वेदनेची लकेर
प्रत्येकीचा आलेख
प्रत्येकीची अखेर
आहे मीरेच्या अंतरंगी...

## कान्ह्याविना काही... (६२)

आजही स्वीकारते मीरा
सावळ्याचे संदर्भ सारे
कल्पकोटी प्रलयानंतरही
प्रेम-विलयानंतरही
आसक्तीच्या पलिकडे
आजही स्वीकारते मीरा
कान्ह्याचं सारं असणं,
कान्ह्याचं सारं देवत्व
वृंदावनाच्या रात्रीला
आरंभ नाही
या प्रेमाच्या यात्रेला
अंत नाही
मीरेच्या जीवाला
उसंत नाही
कान्ह्याविना काही
काहीच दिसत नाही...

## म्हणोत कुणी वेडी... (६३)

अस्तित्त्वाच्या आरंभापासून
प्रेमाच्या उंबऱ्यावर
कान्ह्याची वाट पाहात
सावळ्याचे सोहळे
तनामनात, नसानसांत
साठवत, सजवत
जगते आहे मीरा
जगणार आहे मीरा...
म्हणोत कुणी वेडी मला
बोटे मोडून करोत अपवाद
कुणास वाटो हाच प्रमाद
एक तुझ्याशीच उरला संवाद...

## तेव्हा म्हणालास,... ६४

"जेव्हा एकदा भेटलास
प्राणपणानं मिटलास
माझ्या मनाच्या पाकळीत
तेव्हा म्हणालास
सोडून दे 'स्व'ला
अमोघ प्रवाहात..."
"वास्तविकपणे,
दिलंस मला,
थोडं तरी समाधान?
दिलास का न्याय?
देऊ शकलास
माझी अशी
अविचल जागा?...
ते दिलंस मला
जे नको होतं तुझ्या सख्यांना
ती होती 'वेदना'
स्वीकारली मी देखील
प्रेमदान समजून"

## दूर राहणारा महासागर... ६५

"आता साचला आहे गाळ
मनाच्या आतल्या पदरापासून
घटनांचा - भावनांचा
इच्छांचा - वासनांचा...
या गाळातच बुडते आहे
हा समोरचा महासागर
विस्तारणारा, दूर राहणारा..."

## दे अशा शुभेच्छा!... ६६

"सावळ्या रे,
दे अशा शुभेच्छा की,
या पुढच्या जन्मी
प्रवाहात सोडून देणं
शक्य व्हावं
मनात रूजली
आकांक्षा तुझी
वाढली आहे
फोफावली आहे
सामोऱ्या सागरापेक्षा
मोठा तिचा व्याप आहे...
तू पाहतो आहेस ना?

सावळ्या माझ्याकडे..."
"काळ अवकाशा पल्याडही
लपलं आहे एक गाव
दिसलंय मला, जे...
दिसलंय तुलाही...
त्याच वेशीवर आजवर
काठाकाठानं फिरलास फक्त...
पण आत आला नाहीस...
का? ते...
विचारणार नाही, मीरा..."
"राधेचा राग
काढतोस तू...
सत्यभामेची समजूत
घालतोस तू...
रूक्मिणीची प्रियाराधना
करतोस तू...
पण मीरेपुढं तुझ्या
करू शकत नाहीस काही
तुला ठाऊक आहे कान्ह्या,
तिची अपेक्षाही नाही..."

## अनाम जलबिंदू... (६७)

तुझ्या मीरेकडे फक्त
पाहू शकतोस तू
निर्विकार नजरेनं...
आणि मीरा,
निर्विकार होत जाते
आणि मीरा,
उतरत जाते
वियोगाच्या पायऱ्या...
आणि मीरा,
कृष्णयोगाच्या
असीम जलाशयामधे
सामावते
अनाम जलबिंदू होऊन..."

## सावळ्याची आकाशगंगा... (६९)

"वाट चालून थकलेली
एक चांदणी
शोधतेच आहे,
सावळ्याची आकाशगंगा
ढगात कालवला पाऊस
थबकला आहे,
कोसळणाऱ्या क्षणासाठी
फिकं मुकं आभाळ
ओथंबलंय
पहिल्याच पायरीवर...
उरल्या सुरल्या पणत्या
तेवत आहेत,
मनाच्या ओसरीवर...
खरं खरं सांग,
तू येणार आहेस ना?
तू येणार आहेस ना?..."

## येईल शामसखा... (६८)

वाट पाहते मीरा
एकाकी तारका
कधीतरी केव्हातरी
येईल शामसखा...
"असणे दिसणे तुझे
तळमळ तुझ्या नावाची
एकच मनीचा तरंग
एकच मीरेचा श्रीरंग"...

## अंतरीची मीरा... (७०)

सोनपावलांनी
सावळ्या येतो
मीरेला मनीचे
गूज सांगतो
"आर्त साद घालतो
तुझाच एकतारा
दर्दमयी प्रेममयी
अंतरीची मीरा
शांत लय संगीत
संगतीचा दादरा
प्रेमतराणा उठे
वेदनेचा बोल मिटे
भावतो, लोभावतो
हाव भाव गहिरा
दर्दमयी प्रेममयी
अंतरीची मीरा..."

## तेवणाऱ्या प्राणज्योती...



"कुठे कधी केव्हा कसे
प्रश्न जसे अवघडले गं ऽऽऽ
जन्मांतरीचे जुने परी
नाते नव्याने जडले गं ऽऽऽ
गुंफुनी बकुळीची फुले
हरवशी गंधरानी गं ऽऽऽ
हरवले तुला तुझेच
प्राण ते मज सापडले गं ऽऽऽ
अंधार नाही, दार नाही
दिशांच्या खुणा विरल्या गं ऽऽऽ
तेवणाऱ्या प्राणज्योती परी
तुझ्या माझ्यात पुन्हा उरल्या गं ऽऽ
मीरे सखये प्राणेश्वरी,
क्षण क्षण प्रेमाचा हर्षे गं ऽऽऽ
माझ्या मनीं जो कोंदटतो
घन घन प्रेमाचा वर्षे गं ऽऽऽ"

कान्ह्याचं स्वप्नं
अश्रुंतून ओघळतं
कान्ह्याचं सत्य
मीरेला वेडावतं...

*अनघा दिघे*